केंद्र पुरस्कृत किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG) करिता SNA-SPARSH या निधी प्रवाह कार्यपध्दतीतून अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र शासनाने सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गांकरिता Mother Sanction केलेल्या निधीच्या वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र.४२/का.५ (e-१६२४५०७)
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट,२०२६

संदर्भ:- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.७.५.२०२६,
३) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/का-६, दि.१३.५.२०२६,
४) सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. .बीयुडी- २०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.५.२०२६,
५) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०२६/प्र.क्र.४२/का.५, दि.२८.४.२०२६,
६) महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.CD-II-१४/१०/२०२६-CD-II, दि.४.८.२०२६.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी SNA SPARSH ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती लागू करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे.

महिला व बाल विकास विभागांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यक्रमाखाली "किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG)" या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार वितरीत करण्यात येतो. सदर कार्यक्रमाकरीता केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ५०: ५० असे आहे.

त्यानुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG) करिता संदर्भाधीन क्र. ६ येथील पत्रान्वये दिलेल्या मातृ मंजूरीस (Mother Sanction) अनुसरून सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) या सर्व प्रवर्गाकरिताचा केंद्र हिश्याचा एकूण रुपये २५०.३१ लक्ष इतका निधी व त्यास समरूप राज्य हिश्याचा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक बाल विकास सेवा या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत "किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG)" या योजनेकरिता केंद्र शासनाने सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) या सर्व प्रवर्गाकरिता प्राप्त Mother Sanction च्या मर्यादेत केंद्र हिस्सा एकूण रुपये २५०.३१ लक्ष व त्यास समरूप राज्य हिश्याचा रुपये २५०.३१ लक्ष निधी खालीलप्रमाणे रकाना क्र. २ येथील लेखाशीर्ष / उद्दिष्टामधून रकाना क्र. ५ येथे नमूद केल्यानुसार एकूण रुपये ५००.६२ लक्ष (अक्षरी रुपये पाच कोटी बासष्ठ हजार फ़क्त/-) एवढा निधी नियंत्रक अधिकारी तथा

एकल समन्वय यंत्रणा (Single Nodal Agency- SNA SPARSH) म्हणून आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना वितरीत व खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

<table>
<tr><th>प्रधान लेखाशीर्ष / संगणक सांकेतांक / उद्दिष्ट</th><th>केंद्र शासनाने आतापर्यंत Mother Sanction केलेलानिधी</th><th>अर्थसंकल्पिय तरतूद सन २०२६-२७</th><th>यापूर्वी वितरीत निधी</th><th>Mother Sanction च्या मर्यादेत प्रस्तावित वितरण</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td colspan="5">सर्वसाधारण (General)</td></tr>
<tr><td>२२३६,पोषण आहार
०२,पोषक अन्न व पेये यांचे वितरण,
१०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम,
(०७) किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण,
(०७) (१३) किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणाकरिता योजना (सबला) (केंद्र हिस्सा ५०%) (कार्यक्रम)
२२३६ १८०२,
३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)</td><td rowspan="2">५१२.६१</td><td>११८२.००</td><td>३१५.३९</td><td>१९७.२२</td></tr>
<tr><td>(०७)(१४) किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणाकरिता योजना (सबला), (राज्य हिस्सा ५०%) (कार्यक्रम)
२२३६ १८११,
३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)</td><td>११८२.००</td><td>३१५.३९</td><td>१९७.२२</td></tr>
<tr><td>एकूण (अ)</td><td>५१२.६१</td><td>२३६४.००</td><td>६३०.७८</td><td>३९४.४४</td></tr>
<tr><td colspan="5">अनुसूचित जाती (SC)</td></tr>
<tr><td>मागणी क्र.एन-३
२२३६, पोषण आहार
०२- पोषक अन्न व पेये यांचे वितरण
७८९- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना
(०१)- किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण
(०१) (०२) किशोरवयीन मुलींकरिता योजना
(केंद्र हिस्सा ५० टक्के) (कार्यक्रम)
२२३६ २६७४,
३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)</td><td rowspan="2">२९.५६</td><td>१२०.००</td><td>०.००</td><td>२९.५६</td></tr>
<tr><td>(०१) (०३) किशोरवयीन मुलींकरिता योजना (राज्य हिस्सा ५० टक्के) (कार्यक्रम)
२२३६ २६८३,
३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)</td><td>१२०.००</td><td>०.००</td><td>२९.५६</td></tr>
<tr><td>एकूण (ब)</td><td>२९.५६</td><td>२४०.००</td><td>०.००</td><td>५९.१२</td></tr>
</table>

अनुसूचित जामाती (ST)				
मागणी क्र.टी-५ २२३६, पोषण आहार ०२- पोषक अन्न व पेये यांचे वितरण ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) - जनजाति क्षेत्र उपयोजना (०१) (०९) किशोरवयीन मुलीकरिता योजना (केंद्र हिस्सा ५० टक्के) (कार्यक्रम), **२२३६ २७३६,** ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	२३.५३	१४१.००	०.००	२३.५३
(०१) (१० किशोरवयीन मुलीकरिता योजना (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ५० टक्के) **२२३६ २७४५,** ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)		१४१.००	०.००	२३.५३
एकूण (क)	**२३.५३**	**२८२.००**	**०.००**	**४७.०६**
एकूण सर्व (अ + ब + क)	**५६५.७**	**२८८६.००**	**६३०.७८**	**५००.६२**

२. सदर निधी SNA SPARSH प्रणालीव्दारे उपयोजनात आणण्यात यावा. त्यानुषंगाने केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सदर निधी उपयोजनात आणण्याची कार्यवाही आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी करावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील दि.७.५.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रक तसेच आदिवासी विकास विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील दि.१३.५.२०२६ व सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भाधीन क्र. ४ येथील दि.१९.५.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रक अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. त्यानुसार सदर परिपत्रकांमधील सूचना विचारात घेऊन कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१९१०१५१३६७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VILAS
RAMDAS
THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.08.19 12:04:20 +05'30'

(वि. रा. ठाकूर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),(लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

४) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.व बा.वि.),जिल्हा परिषद,

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,

७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,

८) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२) / वित्त विभाग (व्यय-६), मंत्रालय, मुंबई,

९) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे उपयोजनात आणण्याकरिता विहित पध्दतीने वितरीत करावा.

१०) निवड नस्ती -का-५.